**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार हॉटेल असोसिएशन, चिकन/मटण/मच्छी विक्रेते, नारळ विक्रेते, को-ऑपरेटिव्ह सोसायटी पदाधिकारी, मिठाई/फरसाण विक्रेते यांची मार्गदर्शनपर बैठक संपन्न...**
- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांनी बल्क वेस्ट जनरेटर (Bulk Waste Generator) यांना दिले कचरा व्यवस्थापनाबाबतचे महत्त्वपूर्ण निर्देश...**
- **Bulk Waste Generator बाबत अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांचे मार्गदर्शन**

दिनांक 16 एप्रिल 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (घ.क.व्य.) सचिन बांगर यांच्या उपस्थितीत हॉटेल असोसिएशन, चिकन/मटण/मच्छी विक्रेते, नारळ विक्रेते, को-ऑपरेटिव्ह सोसायटी पदाधिकारी, मिठाई/फारसाण विक्रेते यांच्याशी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कचरा व्यवस्थापनबाबत विविध उपाययोजना राबविण्याकरीता चर्चास्पर संवाद साधण्यात आला.

सदर बैठकीत "Bulk Waste Generator" बाबत अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांच्यामार्फत सर्व हॉटेल चालक/मालक, चिकन/मटण/मासे विक्रेते, नारळ विक्रेते, मिठाई विक्रेते, बँक्वेट हॉल चालक, सोसायटी पदाधिकारी यांना कचऱ्याच्या विलगीकरणाबाबत घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 च्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करण्यात आले. मिरा भाईंदर शहरातील आस्थापना यांनी निर्माण होणारा कचरा महापालिकेस वर्गीकरण करून देण्याच्या सक्त सूचना या बैठकीमध्ये देण्यात आल्या. ज्या आस्थापना कचरा वर्गीकरणाच्या आदेशांचे पालन करणार नाही, त्यांच्या कचऱ्याचे महापालिका संकलन करणार नाही असे बैठकीदरम्यान उपस्थितांना सूचित करण्यात आले. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2024 या अभियानांतर्गत अति. आयुक्त यांनी सर्व हॉटेल्स, मिठाई विक्रेते, चिकन/मटण/मासे विक्रेते, नारळ विक्रेते, बँक्विट हॉल यांना त्यांच्या परिसरात नियमित स्वच्छता ठेवण्याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर ओला व सुका कचऱ्यासाठी ट्वीन बिनची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आल्या. तसेच शहरात सर्व ठिकाणी सिंगल यूज प्लास्टिकवर कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे कोणत्याही विक्रेत्यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर करू नये, त्याजागी कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा, असेही सांगण्यात आले. मिरा भाईंदर शहराला प्लास्टिक मुक्त करण्यासाठी व स्वच्छ सर्वेक्षण 2024 अभियानात चांगल्या क्रमांकाने मानांकन मिळण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी उपस्थितांना करण्यात आले.